## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**द्वितीय अपील क्रमांक :- १३४८/२०१८/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. राहुल बाळासाहेब कडभाने, : अपिलार्थी
मु.पो.डुबेरे,
ता.सिन्नर, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा,
डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, सिन्नर,
ता.सिन्नर, जि.नाशिक.

**विवेचन**

उपरोक्त अपिलासंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०११ ते २०१७ या कालावधीतील लोकचेतना प्रशिक्षण कार्यक्रमाची सविस्तर खर्चासह माहिती, मंजूर निधी व खर्चाचा संबंधिची शासकीय माहिती व खर्च पत्रक बिले, उपस्थिती भत्ते झालेला खर्चासह तसेच शाळेने घेतलेले इतर सर्व कार्यक्रमांची रुपरेषेसह माहिती मागितली होती. त्यानुषंगाने उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक १७/०२/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, श्री. राजु गंगाराम गोफणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपील निर्णयानंतरही माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगासमोर **दिनांक २०/०४/२०२१ रोजी** सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी."

सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, श्री. राजु गंगाराम गोफणे यांनी आयोगाकडे दिनांक १२/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये टपालाद्वारे लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, मी दिनांक ११/०८/२०१६ ते दिनांक ३०/०५/२०१८ या कालावधीत सदर शाळेत कार्यरत होतो त्यानंतर माझी दिनांक ३०/०५/२०१८ रोजी इगतपुरी तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुशेगांव येथे बदली झाली आहे. सदर डुबेरे शाळेवर कार्यरत असतांना अपिलार्थी यांनी दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली होती. सदर शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत वर्ग असून पटसंख्या २८३ इतकी होती सदर शाळेत शिक्षकेतर कर्मचारी, लिपीक, शिपाई पदे मंजूर नाहीत त्यामुळे शिक्षकेतर कामकाज हे मुख्याध्यापक यांनाच इतर सर्व जबाबदारी सांभाळुन पार पाडावे लागते. अर्ज प्राप्त झाला तो महिना मार्च २०१८ होता मार्च महिन्यामध्ये आर्थिक वर्षा अखेरची कामे व शालेय विद्यार्थ्यांचे वार्षिक परिक्षांचे नियोजन करणे असे कामकाज असते. त्यामुळे अपिलार्थीस अर्जाची मुदत वाढवुन मागितली होती. त्यानंतर प्रथम अपील सुनावणीवेळी अपिलार्थीस प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समक्ष माहिती पुरविली असता अपिलार्थी यांनी माहिती स्विकारली नाही. त्यामुळे दिनांक ११/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविली आहे. त्याबाबतची आवश्यक ती कागदपत्रे आयोगास सादर करीत आहे. तरी, प्रस्तुत प्रकरणी त्यांनी खुलासा मान्य करण्यात येऊन त्यांच्या विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, श्री. राजु गंगाराम गोफणे यांनी ते दिनांक ११/०८/२०१६ ते दिनांक ३०/०५/२०१८ या कालावधीत सदर शाळेत कार्यरत होते त्यानंतर त्यांची दिनांक ३०/०५/२०१८ रोजी इगतपुरी तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुशेगांव येथे बदली झाली आहे. सदर डुबेरे शाळेवर कार्यरत असतांना अपिलार्थी यांनी दिनांक १३/०३/२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली होती. सदर शाळेत १ ली ते ४ थी पर्यंत वर्ग असून पटसंख्या २८३ इतकी होती सदर शाळेत शिक्षकेतर कर्मचारी, लिपीक, शिपाई पदे मंजूर नाहीत त्यामुळे शिक्षकेतर कामकाज हे मुख्याध्यापक यांनाच इतर सर्व जबाबदारी सांभाळुन पार पाडावे लागते. अर्ज प्राप्त झाला तो महिना मार्च २०१८ होता मार्च महिन्यामध्ये आर्थिक वर्षा अखेरची कामे व शालेय विद्यार्थ्यांचे वार्षिक परिक्षांचे नियोजन करणे असे कामकाज असते. त्यामुळे अपिलार्थीस अर्जाची मुदत वाढवुन मागितली होती. त्यानंतर प्रथम अपील सुनावणीवेळी अपिलार्थीस प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समक्ष माहिती पुरविली असता अपिलार्थी यांनी माहिती स्विकारली नाही. त्यामुळे दिनांक ११/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविली असल्याचे नमूद केले. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी

माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, श्री. राजु गंगाराम गोफणे यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**(के. एल. बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 21 OCT 2021

प्रती,

श्री. राजु गंगाराम गोफणे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक.